www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

MH SET 2013 PSYCHOLOGY PAPER 2 FEBRUARY 17, 2013 QUESTION PAPER

FEB – 13213/II

Psychology
Paper II
मानसशास्त्र
प्रश्नपत्रिका II

Time Allowed : 75 Minutes] **[Maximum Marks : 100**

Note : This Paper contains Fifty (50) multiple choice questions, each question carrying Two (2) marks. Attempt *All* questions.

सूचना : या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास** (50) बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन** (2) गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. According to information processing model, failure to solve a problem is mostly because of

   (1) inefficiency of problem solving system.

   (2) limitations of short-term memory.

   (3) limitations of long-term memory.

   (4) problems regarding attention.

   (A) 1 and 4 only

   (B) 2 and 3 only

   (C) 1, 2 and 3 only

   (D) 2, 3 and 4 only

2. Which one of the following psychologists is associated with the development of object relations theory ?

   (A) Melanie Klein

   (B) Karen Horney

   (C) H.S. Sullivan

   (D) Anna Freud

1. वृत्तप्रक्रियण प्रारुपानुसार समस्या समाधानात आलेले अपयश बहुदा खालील कारणांमुळे असते

   (1) समस्या समाधान पद्धतीचा अपुरेपणा

   (2) अल्पकालिन स्मृतीच्या मर्यादा

   (3) दीर्घकालिन स्मृतीच्या मर्यादा

   (4) अवधान विषयक समस्या

   (A) 1 आणि 4 फक्त

   (B) 2 आणि 3 फक्त

   (C) 1, 2 आणि 3 फक्त

   (D) 2, 3 आणि 4 फक्त

2. खालीलपैकी कोणता मानसशास्त्रज्ञ हा ऑब्जेक्ट रिलेशन्स सिद्धांताच्या विकासाशी निगडीत आहे ?

   (A) मॅलेनि क्लाईन

   (B) कॅरन हॉर्ने

   (C) एच्. एस्. सुलीव्हान

   (D) ॲना फ्रॉइड

www.prepp.in

3. With the repeated practice given to the student, he improves his performance because he learns the task. Here learning is a/an

(A) independent variable.

(B) dependent variable.

(C) intervening variable.

(D) moderator variable.

4. In a construction of an ability test, the steps followed in the item analysis are

(A) item discrimination, item reliability, item difficulty, item validity

(B) item reliability, item validity, item difficulty, item discrimination

(C) item validity, item discrimination, item reliability, item difficulty

(D) item difficulty, item discrimination, item reliability, item validity

3. वारंवार सराव केल्यामुळे विद्यार्थी आपल्या निर्वर्तनात सुधारणा करतो कारण तो ते कार्य शिकतो. याठिकाणी अध्ययन हा

(A) स्वतंत्र परिवर्त्य आहे.

(B) परतंत्र परिवर्त्य आहे.

(C) मध्यस्थ परिवर्त्य आहे.

(D) नियामक परिवर्त्य आहे.

4. क्षमता चाचणीच्या निर्मितीमध्ये चाचणी-प्रश्न विश्लेषण करताना पाळण्याच्या पायऱ्या कोणत्या ?

(A) आयटम डिस्क्रिमिनेशन, चाचणी प्रश्न विश्वसनियता, चाचणी प्रश्न काठीण्य, चाचणी प्रश्न वैधता

(B) चाचणी प्रश्न विश्वसनियता, चाचणी प्रश्न वैधता, चाचणी प्रश्न काठीण्य, आयटम डिस्क्रिमिनेशन

(C) चाचणी प्रश्न वैधता, आयटम डिस्क्रिमिनेशन, चाचणी प्रश्न विश्वसनियता, चाचणी प्रश्न काठीण्य

(D) चाचणी प्रश्न काठीण्य, आयटम डिस्क्रिमिनेशन, चाचणी प्रश्न विश्वसनियता व चाचणी प्रश्न वैधता

www.prepp.in

5. Given below are the stages of feature analysis. Rearrange them in correct sequence.

(1) Feature detected

(2) Stimulus presented

(3) Pattern recognized

(4) Features combined

(A) 2, 4, 1, 3

(B) 2, 3, 4, 1

(C) 2, 1, 4, 3

(D) 1, 4, 2, 3

6. Figures that are incomplete in some way will be percieved as an organized whole due to the law of

(A) similarity

(B) proximity

(C) closure

(D) pragnanz

7. The model that claims that a common representational form, usually consisting of description of problem, the initial state, the goal state and a set of strategies work to solve any and all types of problems is

(A) information processing model

(B) domain specific model

(C) associationistic model

(D) gestalt model

5. मुखांग विशेषणाच्या अवस्था खाली दिलेल्या आहेत. त्या योग्य क्रमाने लावा.

(1) मुखांग शोधन

(2) प्रस्तुत उद्दीपक

(3) संघात प्रत्यभिज्ञा

(4) मुखांग एकत्रीकरण

(A) 2, 4, 1, 3

(B) 2, 3, 4, 1

(C) 2, 1, 4, 3

(D) 1, 4, 2, 3

6. काही प्रकाराने अंशत: अपूर्ण आकृती चे संवेदन संपूर्ण संघटीत स्वरूपात होते, याला कोणता नियम म्हणतात ?

(A) समानता

(B) समीपता

(C) बंदिस्तता

(D) अर्थगर्भता

7. समस्या समाधानाच्या ज्या प्रारूपात असे मानले जाते की कोणत्याही व सर्वप्रकारच्या समस्या समाधानात एक सामान्य प्रातिनिधिक नमुना आहे, ज्यात समस्येचे वर्णन, आरंभिक अवस्था, उद्दिष्ट अवस्था व समस्या निरसनाकरीता प्रभावी पद्धती यांचा समावेश असतो, ते प्रारूप कोणते ?

(A) माहिती प्रक्रियन प्रारूप

(B) क्षेत्र-विशिष्ट प्रारूप

(C) साहचर्यवादी प्रारूप

(D) समष्टीवादी प्रारूप

www.prepp.in

8. Which one of the following represents the sequence of events in learning according to Hull ?

(A) Drive increment, Need state, Instrumental activity, Drive decrement

(B) Drive decrement, Need state, Drive increment, Instrumental activity

(C) Drive increment, Instrumental activity, Need state, Drive decrement

(D) Need state, Drive increment, Instrumental activity, Drive decrement

9. In a survey among engineering students, each student was asked to justify his/her choice of specialization branch in about sixty words. This item can be best considered as an example of

(A) objective test item

(B) projective test item

(C) open-ended item

(D) fixed alternative item

8. हल यांच्या मते पुढीलपैकी कोणते घटनाक्रम अध्ययनात आहेत ?

(A) प्रचोदना वृद्धी, गरज-अवस्था, साधक क्रिया, प्रचोदना-घट

(B) प्रचोदना-घट, गरज अवस्था, प्रचोदना-वृद्धी, साधक क्रिया

(C) प्रचोदना वृद्धी, साधक क्रिया, गरज अवस्था, प्रचोदना-घट

(D) गरज अवस्था, प्रचोदना वृद्धी, साधक क्रिया, प्रचोदना-घट

9. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या एका सर्वेक्षणात प्रत्येक विद्यार्थ्याला तिच्या/त्याच्या विशिष्ट शाखेच्या निवडी चे समर्थन अंदाजे 60 शब्दांमधे करावयास सांगितले होते. ह्या चाचणीप्रश्नाला कशाचे उत्तम उदाहरण म्हणून मानता येईल ?

(A) वस्तुनिष्ठ चाचणी प्रश्न

(B) प्रक्षेपण चाचणी घटक

(C) मुक्त-उत्तर चाचणी प्रश्न

(D) निर्धारित पर्याय चाचणी प्रश्न

www.prepp.in

10. Match List I with List II and select the correct answer from the codes given below :

List I (Concept)

(P) Psychoticism

(Q) Big-five

(R) Growth needs

(S) Proprium

List II (Description)

(1) Employs psycholexical approach

(2) Other word for self

(3) Characteristic associated with aggression, non-confirmity, and tough-mindedness

(4) Self-esteem and self-actualization

Codes :

	P	Q	R	S
(A)	1	4	2	3
(B)	2	3	1	4
(C)	3	1	4	2
(D)	4	2	3	1

10. सूची I व सूची II ह्यांच्या जोड्या लावा आणि खालील संकेतांमधून योग्य उत्तर निवडा.

यादी I (संकल्पना)

(P) सायकॉटीसिझम

(Q) बीग-फाईव्ह

(R) वृद्धी गरजा

(S) प्रोप्रियम

यादी II (वर्णन)

(1) मनोभाषिक दृष्टीकोनाचा वापर

(2) स्व: साठीचा दुसरा शब्द

(3) आक्रमकता, अनुसारीता नसणे, आणि कणखर मनाच्या स्वभावाशी संबंधीत

(4) स्व-आदर आणि स्व:वास्तविकिकरण

संकेत :

	P	Q	R	S
(A)	1	4	2	3
(B)	2	3	1	4
(C)	3	1	4	2
(D)	4	2	3	1

www.prepp.in

11. Which one of the following gives the correct sequence of events leading to storage of information in the LTM ?

(A) Semantic encoding, Activation of sensory cortex, Neural engram, Hippocampal activation

(B) Hippocampal activation, Activation of sensory cortex, Neural engram, Semantic encoding

(C) Activation of sensory cortex, Semantic encoding, Hippocampal activation, Neural engram

(D) Activation of sensory cortex, Hippocampal activation, Semantic encoding, Neural engram

11. पुढीलपैकी कोणता एक दीर्घकालिक स्मृतीत माहितीच्या साठवणीकडे नेणाऱ्या घटनांचा अचूक क्रम दर्शवितो ?

(A) अर्थपर संकेतन, वेदनबाध्यकाचे क्रिया-प्रवर्तन, चेतनी स्मृत्यांकन, अश्ममीन क्रिया प्रवर्तन

(B) अश्ममीन क्रिया प्रवर्तन, वेदन बाध्यकाचे क्रियाप्रवर्तन, चेतनी स्मृत्यांकन, अर्थपर संकेतन

(C) वेदनबाध्यकाचे क्रिया प्रवर्तन, अर्थपर संकेतन, अश्ममीन क्रियाप्रवर्तन, चेतनी स्मृत्यांकन

(D) वेदनबाध्यकाचे क्रियाप्रवर्तन, अश्ममीन क्रियाप्रवर्तन, अर्थपर संकेतन, चेतन स्मृत्यांकन

www.prepp.in

12. Match List I with List II and select the correct answer from codes given below

List I (Terms)

(P) Incentive

(Q) Arousal

(R) Instinct

(S) Drive

List II (Explanation)

(1) Motivations are produced to fulfill basic biological requirements.

(2) Motivation is the result of an inborn pattern of behaviour that is biologically determined.

(3) Motivation is because we try to maintain increased levels of physiological activation.

(4) Motivation can be explained in terms of external reward.

Codes :

	P	Q	R	S
(A)	4	3	1	2
(B)	1	2	3	4
(C)	4	3	2	1
(D)	3	4	1	2

12. सूची I व सूची II ह्यांच्या जोड्या लावा आणि खाली दिलेल्या संकेतांमधून योग्य उत्तर निवडा

सूची I (संज्ञा)

(P) प्रलोभन

(Q) जागरण

(R) सहज प्रवृत्ती

(S) प्रचोदना

सूची II (स्पष्टीकरण)

(1) मूळ जैविक आवश्यकता पूर्ण करण्यासाठी प्रेरणांची निर्मिती होते.

(2) प्रेरणा ही जैविकरित्या निर्धारित जन्मजात वर्तन बंधाचा परिणाम आहे.

(3) प्रेरणा आहेत कारण आपण शारिरीय उद्दीपनाच्या वृद्धिंगत पातळ्या राखण्याचा प्रयत्न करतो.

(4) बाह्य बक्षीसा च्या रूपात प्रेरणे ला स्पष्ट करता येते.

संकेत:

	P	Q	R	S
(A)	4	3	1	2
(B)	1	2	3	4
(C)	4	3	2	1
(D)	3	4	1	2

www.prepp.in

13. Myths, religion, art and drama are important to individual functioning in Jungian theory because they

(A) help in preconscious acceptance.

(B) are cultural symbols.

(C) help in controlling hostile impulses.

(D) foster the process of psychological integration.

14. When a problem is solved by identifying subgoals that will take you closer to final goal, you are using

(A) hill climbing.

(B) working backwards.

(C) means-End analysis.

(D) analogical transfer.

13. मिथके, धर्म, कला आणि नाटक हे युंगच्या सिद्धांतानुसार व्यक्तिच्या कार्यासाठी आवश्यक आहेत, कारण

(A) ते पूर्वबोधावस्थेच्या स्विकाराला मदत करतात.

(B) ती सांस्कृतिक प्रतिके आहेत.

(C) ते आक्रमक आवेग नियंत्रणासाठी मदत करतात.

(D) ते मानसिक एकात्मिकरणाच्या प्रक्रियेला मदत करतात.

14. जेंव्हा ऊपउद्दिष्ट्यांचा विचार करून समस्या समाधान केले जाते, ज्यामुळे तुम्ही अंतिम उद्दिष्ट्याच्या जवळ जाता, तुम्ही काय वापरता ?

(A) हिल क्लायंबिंग

(B) प्रतिगामी कार्यरतता

(C) साधक-साध्य विश्लेषण

(D) सादृश्यानुमान

www.prepp.in

15. According to Maslow's theory, which of the following is NOT characteristic of self-actualized person ?

(A) Freshness of appreciation

(B) Religious attainment

(C) Self-sufficiency

(D) Self-determination

16. Müller Lyer illusion is influenced by

(1) age

(2) education

(3) urban-rural environment

(4) culture

(A) Only 1 and 2

(B) Only 2 and 4

(C) Only 2, 3 and 4

(D) All of the above

15. मॅस्लोच्या सिद्धान्तानुसार, खालीलपैकी कोणते स्व-वास्तविकीकरण झालेल्या व्यक्तिचीं गुण-वैशिष्ट्ये **नाहित** ?

(A) रसग्रहणाचा ताजेपणा

(B) धार्मिक संप्राप्ती

(C) स्वयंसिद्धभाव

(D) स्व-विभेदन

16. म्यूलर लायर भासावर कशाचा प्रभाव पडतो ?

(1) वय

(2) शिक्षण

(3) शहरी-ग्रामीण वातावरण

(4) संस्कृती

(A) फक्त 1 व 2

(B) फक्त 2 व 4

(C) फक्त 2, 3 व 4

(D) वरील सर्व

www.prepp.in

17. Read the following statements and judge their truthfulness by choosing correct answer from the alternatives given below the statements.

(1) IQ tests tend to correlate more highly with achievement tests.

(2) IQ tests tend to be better predictors of grades and achievement test scores in the lower grades than in college.

(3) There is some evidence that supports the hypothesis that continuing education raises IQ test scores.

Alternatives :

(A) 1 and 2 are correct.

(B) 1 and 3 are correct.

(C) 2 and 3 are correct.

(D) 1, 2 and 3 are correct.

17. पुढील विधाने वाचा आणि त्या विधानांखाली दिलेल्या पर्यायांमधून बरोबर उत्तराची निवड करून त्यांचा खरेपणा ठरवा.

(1) बुद्धिगुणांक चाचण्या संपादन चाचण्यांशी फार जास्त प्रमाणात सहसंबंधित असतात.

(2) बुद्धिगुणांक चाचण्या महाविद्यालयापेक्षा शाळेतील श्रेणींचे व संपादन चाचण्यांवरील प्राप्तांकांचे अधिक उत्तम भाकित करतात.

(3) शिक्षणाचे सातत्य बुद्धिगुणांक प्राप्तांकात वृद्धि घडवून आणते, या परिकल्पनेला आधार देणारा बराच पुरावा आहे.

पर्याय :

(A) विधाने 1 आणि 2 खरी आहेत.

(B) विधाने 1 आणि 3 खरी आहेत.

(C) विधाने 2 आणि 3 खरी आहेत.

(D) 1, 2 आणि 3 खरी आहेत.

www.prepp.in

18. Surgical removal of hippocampus affects

(A) LTM.

(B) STM.

(C) procedural memory.

(D) working memory.

19. Edwards Personal Preference Schedule employees forced choice format to reduce

(A) acquiescence.

(B) socially desirable responding.

(C) leniency effect.

(D) tendency to give extreme responses.

18. अश्वमीन शस्त्रक्रियेने काढून टाकल्यास त्या चा परिणाम

(A) दीर्घकालिक स्मृतीवर होतो.

(B) अल्पकालिक स्मृतीवर होतो.

(C) प्रक्रियात्मक स्मृतीवर होतो.

(D) कार्यरत स्मृतीवर होतो.

19. एडवर्ड्स पर्सनल प्रेफरन्स शेड्युल अनिवार्य निवड पद्धतीचा काय कमी करण्यासाठी वापर करते ?

(A) अनुसंमती

(B) सामाजिक दृष्ट्या वांच्छनिय अनुक्रिया

(C) सौम्यता परिणाम

(D) टोकाच्या प्रतिक्रिया देण्याची प्रवृत्ती

www.prepp.in

20. Match List I with List II and select the correct answer using the codes given below the list.

List I (Term)

(P) Independent variable

(Q) Dependent variable

(R) Control of carry over effects

(S) Control of individual differences

List II (Method/Technique)

(1) Randomization

(2) Counter-balancing

(3) Measurement

(4) Active manipulation

Codes :

	P	Q	R	S
(A)	4	3	1	2
(B)	3	4	2	1
(C)	3	4	1	2
(D)	4	3	2	1

20. सूची I व सूची II ह्यांच्या जोड्या लावा आणि खाली दिलेल्या संकेतांमधून योग्य उत्तर निवडा :

सूची I (संज्ञा)

(P) स्वतंत्र परिवर्त्य

(Q) आश्रित परिवर्त्य

(R) कॅरी-ओव्हर परिणामाचे नियंत्रण

(S) व्यक्ति-भेदांचे नियंत्रण

सूची II (पद्धती/तंत्र)

(1) अनियतीकरण

(2) प्रति-संतुलन

(3) मापन

(4) सक्रिय हाताळणी

संकेत :

	P	Q	R	S
(A)	4	3	1	2
(B)	3	4	2	1
(C)	3	4	1	2
(D)	4	3	2	1

www.prepp.in

21. Which of the following statements regarding emotion are *true* ?

(1) Experience of emotion is associated with arousal of sympathetic nervous system.

(2) One of the important functions of emotion is to prepare the being for action.

(3) Left hemisphere is more active than the right when people have to identify emotion on another person's face.

(4) Right hemisphere is more active than the left when people have to identify emotion on another person's face.

(A) 1, 2 and 3

(B) 1, 2 and 4

(C) 2, 3 and 4

(D) 3, 4 and 1

21. भावनेशी संबंधित खालील विधानांपैकी कोणती विधाने **खरी** आहेत ?

(1) भावनेचा अनुभव अनुकंपी मज्जासंस्थेच्या उद्दीपनाशी संबंधित आहे.

(2) क्रियेसाठी व्यक्तीची तयारी करणे हे भावनेच्या महत्वपूर्ण कार्यांपैकी एक महत्वाचे कार्य आहे.

(3) जेव्हा लोकांना दुसऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील भावना ओळखायच्या असतात तेव्हा उजव्या गोलार्धापेक्षा डावा गोलार्ध अधिक कार्यप्रवण होतो.

(4) जेव्हा लोकांना दुसऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील भावना ओळखायच्या असतात तेव्हा डाव्या गोलार्धापेक्षा उजवा गोलार्ध अधिक कार्यप्रवण होतो.

(A) 1, 2 आणि 3

(B) 1, 2 आणि 4

(C) 2, 3 आणि 4

(D) 3, 4 आणि 1

www.prepp.in

22. Psychologists have developed research methods to disentangle hereditory and environmental factors. Which of the following methods can serve the purpose ?

(1) The study of twins

(2) The study of adopted children

(3) The study of ethnic groups

(4) The study of children from different cultures.

(A) 1 and 3 only

(B) 1 and 2 only

(C) 1 and 4 only

(D) 1, 2 and 4 only

23. Skinner's conditioning is also called as instrumental conditioning because

(A) Skinner has used an instrument, namely 'Skinner box'.

(B) in Skinner's experiment. CR is a means to bring in US.

(C) Skinner's conditioning is different from Pavlovian classical conditioning.

(D) Skinner's conditioning is used for behaviour modification.

22. मानसशास्त्रज्ञांनी आनुवंशिकता आणि परिस्थितीजन्य कारक वेगळे करण्याच्या पद्धती विकसित केल्या आहेत. खालीलपैकी कोणत्या पद्धती प्रस्तुत हेतू सिद्ध करू शकतात ?

(1) जुळ्यांचा अभ्यास

(2) दतक मुलांचा अभ्यास

(3) वंशीय समूहांचा अभ्यास

(4) निरनिराळ्या संस्कृतीमधील मुलाचा अभ्यास

(A) 1 आणि 3 फक्त

(B) 1 आणि 2 फक्त

(C) 1 आणि 4 फक्त

(D) 1, 2 आणि 4 फक्त

23. स्किनरने दिलेल्या अभिसंधानाला साधक अभिसंधान असेही म्हटले जाते कारण

(A) स्किनरने 'स्किनर पेटिका' या उपकरणाचा वापर केला.

(B) स्किनरच्या प्रयोगात अभिसंधित प्रतिक्रियेत अनभिसंधित उद्दीपक प्राप्त करण्यासाठी वापर होतो.

(C) स्किनरने दिलेले अभिसंधान पॅव्हलॉवने दिलेल्या अभिजात अभिसंधानापेक्षा वेगळे आहे.

(D) वर्तनात सुधारणा करण्यासाठी स्किनरने दिलेल्या अभिसंधानाचा वापर होतो.

www.prepp.in

24. Consider the following statements regarding the interval scale measurement

(1) There is no meaningful zero point.

(2) A score of 8 is twice as high as a score of 4.

(3) Scores can be analyzed by parametric test.

(4) The difference between 5 and 10 need not be same as the difference between 10 and 15.

Which of the following statements given above are *correct* ?

(A) 1 and 3

(B) 1 and 4

(C) 2 and 3

(D) 2 and 4

25. Which of the following are *true* in case of self-concept ?

(1) Self-view includes multiple selves.

(2) Self-perception process is a source of self-concept.

(3) Reflected appraisal process is not a source of self-concept.

(4) Self-concept helps us in shaping the reasoning.

(A) 1 and 2

(B) 2 and 4

(C) 1, 2 and 3

(D) 2, 3 and 4

24. सम-अंतर मापनीबाबत खालील विधानांचा विचार करा :

(1) यात अर्थपूर्ण शून्य बिंदू नसतो.

(2) प्राप्तांक 8 हा प्राप्तांक 4 च्या दुप्पट मोठा असतो.

(3) प्राप्तांकाचे विश्लेषण प्राचलिक चाचणीद्वारे करता येते.

(4) प्राप्तांक 5 आणि 10 यांच्यातील फरक हा प्राप्तांक 10 आणि 15 यांच्यातील फरकाइतका असण्याची गरज नाहीं.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

(A) 1 आणि 3

(B) 1 आणि 4

(C) 2 आणि 3

(D) 2 आणि 4

25. स्व-संकल्पनेबाबत खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(1) स्व: दृष्टीकोनात बहुविध-स्व: समाविष्ट होतात.

(2) स्व-संवेदन प्रक्रिया हा स्व-संकल्पनेचा स्रोत आहे.

(3) परावर्तीत निर्धारण प्रक्रिया ही स्व-संकल्पनेचा स्रोत नाही.

(4) स्व-संकल्पना युक्तिवादाला मदत करते.

(A) 1 आणि 2

(B) 2 आणि 4

(C) 1, 2 आणि 3

(D) 2, 3 आणि 4

www.prepp.in

26. Read the following statements and select the *correct* answer.

(I) Night terror is a phenomenon of NREM.

(II) Nightmree is a phenomenon of REM sleep.

(III) Night terror is more common in children.

(IV) REM behaviour disorder is more common in older people.

(A) I, II, III and IV are true.

(B) Only I and II are true.

(C) Only II, III and IV are true.

(D) Only I, II and III are true.

27. The stages of concept formation are :

(A) Generalization and discrimination

(B) Generalization and evaluation

(C) Generalization, discrimination and abstraction

(D) Abstraction, evalution and generalization

26. खालील विधाने वाचा आणि **अचूक** उत्तराची निवड करा.

(I) निशा दहशत ही NREM निद्रेची घटना आहे.

(II) चिंतास्वप्न ही REM निद्रेची घटना आहे.

(III) निशा दहशत मुलांमधे सामान्यत: अधिक दिसते.

(IV) REM वर्तनविकृती वृद्ध लोकांमधे सामान्यत: अधिक आढळते.

(A) I, II, III व IV खरी आहेत.

(B) फक्त I व II खरी आहेत.

(C) फक्त II, III व IV खरी आहेत.

(D) फक्त I, II व III खरी आहेत.

27. संकल्पना निर्मितीचे विविध टप्पे कोणते ?

(A) सामान्यीकरण व भेदन

(B) सामान्यीकरण व मूल्यमापन

(C) सामान्यीकरण, भेदन आणि अमूर्तीकरण

(D) अमूर्तीकरण, मूल्यमापन आणि सामान्यीकरण

www.prepp.in

28. Match List I with List II and choose the right answer from the codes below.

List I (Disorder)

(P) Ataxia

(Q) Aphasia

(R) Amnesia

(S) Apraxia

List II (Description)

(1) Loss of ability to use and comprehend language

(2) Loss of ability to perform skilled movements

(3) Loss of motor co-ordination

(4) Loss of ability to recognize a familiar object

(5) Loss of ability to register and/or retrieval of information

Codes :

	P	Q	R	S
(A)	5	1	2	3
(B)	3	2	1	4
(C)	2	5	4	1
(D)	3	1	5	2

28. सूची I व सूची II यांच्या जोड्या लावा व दिलेल्या संकेतांमधून योग्य उत्तर निवडा :

सूची I (दोष)

(P) अटॅक्सिआ

(Q) अफॅसिआ

(R) ॲम्नेशिआ

(S) अप्रॅक्सिआ

सूची II (वर्णन)

(1) भाषा वापरण्याच्या व आकलनाच्या क्षमतेचा ऱ्हास

(2) कौशल्यपूर्ण हालचाली करण्याच्या क्षमतेचा ऱ्हास

(3) कारक सुसुत्रतेचा ऱ्हास

(4) ओळखिच्या गोष्टींबाबत प्रत्याभिज्ञेचा ऱ्हास

(5) माहिती साठवणे आणि/किंवा आठवणे या क्षमतेचा ऱ्हास

संकेत :

	P	Q	R	S
(A)	5	1	2	3
(B)	3	2	1	4
(C)	2	5	4	1
(D)	3	1	5	2

www.prepp.in

29. Match List I with List II and select the correct answer using the codes given below the lists.

List I (Event)

(P) Imprinting

(Q) Respondent behaviour

(R) Operant behaviour

(S) Higher order conditioning

List II (Description of the event)

(1) When CR brings in US in conditioning

(2) When wrapper of a chocolate becomes CS for the actual chocolate

(3) When CR is a natural reflex in conditioning

(4) When the chicks follow their mother after they are hatched

Codes :

	P	Q	R	S
(A)	4	1	3	2
(B)	3	2	4	1
(C)	4	3	1	2
(D)	2	1	4	3

29. सूची I व सूची II मधील जोड्या लावा व खालील संकेत वापरून योग्य उत्तर निवडा.

सूची I (घटना)

(P) इम्प्रिंटींग

(Q) प्रतिक्रियात्मक वर्तन

(R) व्यापारणात्मक वर्तन

(S) उच्चस्तरीय अभिसंधान

सूची II (घटनेचे वर्णन)

(1) जेव्हा अभिसंधित प्रतिक्रियेमुळे अनभिसंधित उद्दीपक प्राप्त होतो

(2) जेव्हा प्रत्यक्ष चॉकलेटच्या ऐवजी चॉकलेटचे आवरण हा अभिसंधित उद्दीपक होतो

(3) जेव्हा अभिसंधानात अभिसंधित प्रतिक्रिया ही नैसर्गिक प्रतिक्षेप असते

(4) जेव्हा कोंबडीची पिले उबवल्यानंतर ताबडतोब त्यांच्या आईच्या पाठोपाठ जातात.

संकेत :

	P	Q	R	S
(A)	4	1	3	2
(B)	3	2	4	1
(C)	4	3	1	2
(D)	2	1	4	3

www.prepp.in

30. In memory, constructive processes are associated with all of the following *except*

(A) memorisation.

(B) interpretation.

(C) expectation.

(D) organisation.

Instructions for question Nos. 31 to 33 :

Read the following paragraph and answer the three questions following it.

Paragraph : A researcher wanted to develop a new test of sociability. He prepared a draft version containing 50 dichotomous items. Item analysis was carried out by applying item-remainder correlations. The item analysis resulted

30. स्मृतीतील रचनात्मक प्रक्रियेचा संबंध खालीलपैकी एकसोडून बाकीच्यांशी असतो.

(A) स्मरण

(B) अर्थविवरण

(C) अपेक्षण

(D) संघटन

प्रश्न क्रमांक 31 ते 33 साठीच्या सूचना :

पुढील परिच्छेद वाचून त्याखालील तीन प्रश्नाची उत्तरे लिहा.

परिच्छेद : एका संशोधकाला समाजशीलतेची नवीन चाचणी विकसीत करायची आहे. त्याने 50 द्विभाजीत चाचणी प्रश्नांचा मसुदा बनविला. आयटम-रिमेंडर सहसंबंधन वापरून चाचणी प्रश्न विश्लेषण केले. चाचणी-प्रश्न

www.prepp.in

in the deletion of 10 items. The researcher correlated the item analyzed version of the test with an already established test of sociability and obtained a correlation of 0.28, significant at .01 level (N = 400). The odd-even reliability coefficient, corrected by Spearman-Brown formula, for the item analyzed version was found to be 0.42.

विश्लेषणाच्या आधारे 10 चाचणी प्रश्न वगळले गेले. त्यानंतर चाचणीचे एका प्रस्थापित समाजशिलतेच्या चाचणीबरोबर सहसंबंधन काढले. मिळालेले सहसंबंधन हे 0.28 असून 0.01 पसळीवर (N = 400) सार्थक आहे. स्पिअरमन ब्राउन सुत्राने दुरुस्त केलेला सम-विषम विश्वसनियता गुणांक हा चाचणी प्रश्न विश्लेषित मसूद्यासाठी 0.42 इतका मिळाला.

31. Which one of the following correlation coefficient is suitable for obtaining item-remainder correlations ?

(A) Spearman's rank-difference correlation

(B) Point-biserial correlation

(C) Phi coefficient

(D) Tetrachoric correlation

31. आयटेम-रिमेंडर सहसंबंध मिळविण्यासाठी खालीलपैकी कोणता सहसंबंध गुणांक योग्य राहील ?

(A) स्पीअरमनचा गुणाणुक्रम सहसंबंध

(B) बिंदु-द्विश्रेणिक सहसंबंध

(C) फाय सहसंबंध

(D) चतुष्कोटक सहसंबंध

www.prepp.in

32. For the new test, there is an evidence for the

(A) satisfactory parallel form reliability.

(B) unsatisfactory parallel form reliability.

(C) satisfactory concurrent validity.

(D) unsatisfactory concurrent validity.

33. Which one of the following inferences can be drawn for the new test ?

(A) The test has excellent internal consistency

(B) The test has satisfactory internal consistency

(C) The test has poor internal consistency

(D) The provided data are inadequate for inferring about the internal consistency

32. नवीन चाचणीसाठी खालीलपैकी कशाला पुरावा मिळतो ?

(A) समाधानकारक समांतर रूप विश्वसनियता

(B) असमाधानकारक समांतर रूप विश्वशनियता

(C) समाधानकारक समवर्ती वैधता

(D) असमाधानकारक समवर्ती वैधता

33. खालीलपैकी कोणता निष्कर्ष नविन चाचणीसाठी काढता येतो ?

(A) चाचणीची अंतर्गत सुसंगती ही उत्तम आहे.

(B) चाचणीची अंतर्गत सुसंगती ही समाधानकारक आहे.

(C) चाचणीची अंतर्गत सुसंगती ही निकृष्ट आहे.

(D) दिलेले प्रदत्त हे अंतर्गत सुसंगतीबाबत निष्कर्ष काढण्यासाठी अपूरे आहेत.

www.prepp.in

Questions 34 to 37 :

In the following questions, each question has two statements– Assertion (A) and Reason (R). Read each question carefully and decide whether Assertion and Reason are individually correct or not, and if they are correct, whether the Reason is a valid explanation of the Assertion. For each question, before the corresponding question number, indicate your answer using the following codes :

(A) Both A and R are true and R is the correct explanation of A.

(B) Both A and R are true but R is NOT the correct explanation.

(C) A is true but R is false

(D) A is false but R is true.

34. Assertion (A) : Each eye sees a slightly different view which helps in perception.

Reason (R) : Retinal disparity results in three dimensional impression.

प्रश्न 34 ते 37 :

खालील प्रश्नांमध्ये, प्रत्येक प्रश्नात दोन वाक्ये आहेत-एक विधान (Assertion or A) व कारण (Reason or R). प्रत्येक प्रश्न काळजीपूर्वक वाचा. विधान आणि कारण स्वतंत्रपणे बरोबर आहेत की नाही ते ठरवा, आणि ती बरोबर असतील तर कारण हे विधानाचे यथार्थ स्पष्टीकरण आहे का ते ठरवा. प्रत्येक प्रश्नासाठी त्याच्या योग्य प्रश्नक्रमांकासमोर खालील संकेतन वापरून आपले उत्तर दर्शवा.

(A) विधान (A) व कारण (R) दोन्ही सत्य आहेत व कारण (R) हे विधानाचे योग्य स्पष्टीकरण आहे.

(B) विधान (A) व कारण (R) दोन्ही सत्य आहेत पण कारण (R) हे बरोबर स्पष्टीकरण नाही.

(C) विधान (A) सत्य आहे पण कारण (R) चूक आहे.

(D) विधान (A) चूक आहे पण कारण (R) सत्य आहे.

34. विधान (A) : प्रत्येक डोळा किंचित वेगळे दृश्य बघतो, ज्यामुळे संवेदनाला मदत होते.

कारण (R) : दृष्टीपटलाची विषमता त्रिमितीय प्रतिमा निर्माण करते.

www.prepp.in

35. Assertion (A) : Heuristics are known to be less efficient methods of problem solving.

Reason (R) : Heuristics increase the odds of finding path to goal and does not guarantee the solution.

36. Assertion (A) : Under normal conditions, I.Q. of a person changes rapidly throughout his life span.

Reason (R) : Life span may vary depending on the quality of life.

37. Assertion (A) : Studies have shown that continued conflict deteriorates physical health.

Reason (R) : One frequent outcome of prolonged stress is the production of gastric ulcers.

35. विधान (A) : नवगामी पद्धती समस्या-समाधानाच्या अकार्यक्षम पद्धती म्हणून ओळखल्या जातात.

कारण (R) : उत्तराकडे नेणाऱ्या मार्गांमधील विसंगती नवगामी पद्धती वाढवितात आणि त्याने उत्तर मिळेळ अशी खात्री नसते.

36. विधान (A) : सर्व सामान्य परिस्थितीत व्यक्तीचा बुद्धिगुणांक आयुष्यभरात जलदगतीने बदलतो.

कारण (R) : जीवनाच्या गुणवत्तेनुसार आयुष्मान बदलते.

37. विधान (A) : अध्ययनांनी हे दर्शविले आहे की सतत चा संघर्ष शारीरिक स्वास्थ्यास हानिकारक असतो.

कारण (R) : दीर्घकालीन तणाबाचा वारंवार दिसून येणारा एक परिणाम म्हणजे गॅस्ट्रिक व्रणांची उत्पत्ती.

www.prepp.in

38. In the age group of 25 to 50 years, certain types of intelligence decline with age while others do not. Which of the following is the type that improves or holds throughout age ?

(A) Fluid intelligence

(B) General intelligence

(C) Crystalized intelligence

(D) Global intelligence

39. The correlation between two variables measured in nominal scale is assessed using :

(A) Contingency coefficient

(B) Spearman's rank order correlation

(C) Point biserial correlation

(D) Pearson's product moment correlation

40. Which of the following is TRUE about iconic memory ?

(1) Has very high capacity

(2) Duration is in milliseconds

(3) Sensory pattern is recognized

(4) Retrieval involves parallel self-terminating search

(A) 1 and 2 only

(B) 2 and 3 only

(C) 1 and 4 only

(D) 2 and 4 only

38. 25 ते 50 या वयोगटा मध्ये, विशिष्ट प्रकारच्या बुद्धिमत्तांमधे वाढत्या वयासोबत घट होते परंतु काहींमधे होत नाही. खालीलपैकी कोणत्या प्रकारात वाढ किंवा स्थिरता दिसते ?

(A) तरल बुद्धिमत्ता

(B) सामान्य बुद्धिमत्ता

(C) स्फटिक बुद्धिमत्ता

(D) ग्लोबल बुद्धिमत्ता

39. नाममात्र श्रेणीद्वारा मापन केलेल्या दोन परिवर्त्यांमधील सहसंबंध (खालीलपैकी) कशाचा उपयोग करून निर्धारित केला जातो ?

(A) आनुषंगिकत्ता गुणांक

(B) स्पिअरमनचा क्रम-भेद सहसंबंध

(C) बिंदु-द्विश्रेणिक सहसंबंध

(D) पियर्सनचा गुणाकार परिबल सहसंबंध

40. प्रतिमा स्मृतीच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान खरे आहे ?

(1) प्रतिमास्मृतीची क्षमता उच्च असते.

(2) कालावधी मिलीसेकंदात असतो.

(3) वेदन संधानाचे प्रत्यभिज्ञान असते.

(4) प्रत्यानयनात समांतर स्वप्रवर्तित अन्त्यगामी शोध असतो.

(A) 1 आणि 2 फक्त

(B) 2 आणि 3 फक्त

(C) 1 आणि 4 फक्त

(D) 2 आणि 4 फक्त

www.prepp.in

41. Consider the following types of investigations :

(1) Field experiment

(2) Laboratory experiment

(3) Ex post facto research

The typical sequential arrangement of these investigations in descending order in terms of researchers ability to control secondary variance would be

(A) 1, 2, 3

(B) 2, 1, 3

(C) 2, 3, 1

(D) 3, 1, 2

42. Lateralization refers to

(A) the process of specialization of brain functions by either the right or the left hemisphere.

(B) co-ordinated activity of right and left cerebral hemisphere.

(C) language dominance as a function of handedness.

(D) communication between two cerebral hemispheres.

41. अन्वेषणांचे खालील प्रकार लक्षात घ्या :

(1) क्षेत्रीय प्रयोग

(2) प्रयोगशाळेतील प्रयोग

(3) घटना-पश्चात संशोधन

संशोधकाच्या दुय्यम प्रचरणाच्या नियंत्रण क्षमतेच्या संदर्भात ह्या संशोधनांची उतरत्या क्रमाची अनुक्रमिक व्यवस्था कशी राहील ?

(A) 1, 2, 3

(B) 2, 1, 3

(C) 2, 3, 1

(D) 3, 1, 2

42. लॅटरालायझेशन म्हणजे

(A) उजव्या किंवा डाव्या गोलार्धामध्ये मेंदूच्या कार्याच्या विशेषीकरणाची प्रक्रिया.

(B) उजव्या व डाव्या प्रमस्तिष्क गोलार्धांचे समन्वयीत कार्य.

(C) हस्तप्रभावितेनुसार भाषा प्रभाव ठरणे.

(D) दोन प्रमष्तिक गोलार्धांमधील संप्रेषण.

www.prepp.in

43. What will happen if the lateral hypothalamus is damaged ?

(A) Binge eating

(B) Oversleeping

(C) Starvation

(D) Sleeplessness

44. Which of the following is *true* in the case of "all or none" impulse transmission ?

(1) Impulses are transmitted through action potentials.

(2) Always leads to post synaptic excitation.

(3) The neuranal transmission is bidirectional.

(4) Involves the release of neuro-transmitters by the pre-synaptic neuron.

(A) 1 and 2

(B) 2 and 3

(C) 1 and 4

(D) 1, 3 and 4

43. जर पार्श्वीअधश्चेताक्षेपकास इजा झाली तर काय घडेल ?

(A) अति जास्त प्रमाणात खाणे

(B) अति जास्त झोपणे

(C) उपासमार

(D) अनिद्रा

44. "सर्व वा नैक" आवेग प्रेषणाबाबत खालीलपैकी काय **खरे** आहे ?

(1) आवेग हे क्रियाविभवाद्वारे प्रेषित होतात.

(2) कायम चेतासंपर्कोत्तर उत्तेजन निर्माण करतात.

(3) चेताप्रेषण हे द्वि-दिशिय असते.

(4) चेतासंपर्कपूर्व चेतापेशीद्वारे चेतापारेषक सोडले जातात.

(A) 1 आणि 2

(B) 2 आणि 3

(C) 1 आणि 4

(D) 1, 3 आणि 4

www.prepp.in

45. Action potential refers to

(A) a phase where neuron is not sending signal but is potentially ready to send signal.

(B) imbalance in voltage causeing a potential difference across cell membrane.

(C) high electrical activity when a neuron sends information down an axon.

(D) potential ability of enzymes to clear neurotransmitters.

46. Which one of the following is related to speech production ?

(A) Angular gyrus

(B) Broca's area

(C) Wernicke's area

(D) Frontal lobe

47. An object seen from different angles cast different images, but it is still recognized as being the same. This is called as

(A) object constancy

(B) shape constancy

(C) size constancy

(D) feature constancy

45. क्रियाविभव म्हणजे

(A) अशी स्थिती जेव्हा चेतापेशी संकेत पाठवत नसते परंतु संकेत पाठविण्यासाठी तयार असते.

(B) व्होल्टेजमधील फरकामुळे पेशीपटलावर विभवात्मक फरक पडतो.

(C) अक्षतंतूकडे माहिती पाठवताना निर्माण होणारी उच्च विद्युत सक्रियता.

(D) चेतापारेषकांना काढून टाकण्याची एन्झाइमची विभवात्मक क्षमता.

46. भाषा निर्मितीशी खालीलपैकी कोणते संबंधीत आहे ?

(A) कोनिय संवली

(B) ब्रोकाचे क्षेत्र

(C) वेर्निकेचे क्षेत्र

(D) अग्रखंड

47. वेगवेगळया कोनातून पाहिलेल्या वस्तुच्या विविध प्रतिमा पडतात, तरीही तीच वस्तु असल्याचे ओळखता येते. याला काय म्हणतात ?

(A) वस्तु स्थिरता

(B) रूपरेखा स्थिरता

(C) आकारमान स्थिरता

(D) विशेष-लक्षणा स्थिरता

www.prepp.in

48. Which of the following statements are TRUE about classical conditioning ?

(1) Done on emitted response.

(2) Conditioned stimulus is well defined.

(3) Involves voluntary response.

(4) Leads to sign learning.

(A) 1 and 2

(B) 2 and 3

(C) 1 and 4

(D) 2 and 4

49. Ebbinghaus used non-sense syllables in the experiments to

(A) make the student learn the difficult items.

(B) compare the performance with the meaningful words.

(C) avoid the meaningful material because it is interesting.

(D) Control the familiarity variable in the experiment.

50. Which one of the following statements is *not true* of concepts ?

(A) It leads to grouping experiences.

(B) It assists in abstract thinking.

(C) It helps in problem solving.

(D) Once formed, concepts remain constant.

48. अभिजात अभिसंधानाच्या बाबतीत पुढीलपैकी कोणती विधाने **खरी** आहेत ?

(1) अर्जित प्रतिक्रियांचा यात वापर होतो.

(2) अभिसंधित उद्दीपकाचे यथोचित वर्णन केले असते.

(3) ऐच्छिक प्रतिक्रियांचा यात अंतर्भाव होतो.

(4) चिन्ह-अध्ययनाला ते प्रवृत्त करते.

(A) 1 आणि 2

(B) 2 आणि 3

(C) 1 आणि 4

(D) 2 आणि 4

49. एबिंगहॉस यांनी निरर्थक पदांचा वापर कोणत्या कारणासाठी केला ?

(A) विद्यार्थ्यांनी कठीण पदांचे अध्ययन करण्यासाठी

(B) अर्थयुक्त शब्दांच्या निर्वर्तनाशी तुलना करण्यासाठी

(C) अर्थयुक्त साहित्य रोचक असल्याने ते करण्यासाठी

(D) प्रयोगात परिचितता हा परिवर्त्य नियंत्रित करण्यासाठी

50. संकल्पने विषयी खालीलपैकी कोणते विधान **असत्य** आहे ?

(A) त्या अनुभवांचे गट पाडतात.

(B) अमूर्त विचारप्रक्रियेस त्या मदत करतात.

(C) समस्या समाधानास त्या सहाय्य करतात.

(D) एकदा निर्माण केलेली संकल्पना स्थिर रहाते.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

ROUGH WORK

Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

ROUGH WORK

Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र. **F**

Paper-II
PSYCHOLOGY

Signature and Name of Invigilator

1. (Signature) .....

(Name) .....

2. (Signature) .....

(Name) .....

Seat No. | | | | | | |
(In figures as in Admit Card)

Seat No. .....
(In words)

OMR Sheet No. | | | | | | |
(To be filled by the Candidate)

FEB - 13213

Time Allowed : 1¼ Hours] **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **32**

Number of Questions in this Booklet : **50**

Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   Example : where (C) is the correct response.

   (A) (B) ● (D)

5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **50** बहुपर्याय प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी आवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   उदा. : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.

   (A) (B) ● (D)

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**